उपरोक्त तुकडया पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१] विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या तुकडयांना दिनांक १४ जुलै २००० च्या शासन निर्णयातील अनुदान सुत्र किंवा जेव्हा त्या तुकड्या अनुदानास पात्र ठरून अनुदानावर आणल्या जातील त्यावेळी जे अनुदानाचे सूत्र असेल ते लागू राहील.

२] अशा तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार निकषपात्र तुकडयांना शासन अनुदान लागू करीत असते हे अनुदान भूतलक्षी प्रभावाने लागू केले जाणार नाही. जेव्हा पासून अनुदान सुरु करण्यात येईल त्यावेळी अशा तुकडयांना ज्या टप्प्यावरील अनुदान देय राहील त्या टप्प्यावरील अनुदान लागू करण्यात येईल, तत्पूर्वीचे कोणतेही अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

३] नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त अति - रिक्त तुकडया या केवळ कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत. अशा तुकडया अनुदानास पात्र असणार नाहीत. ४

४] कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेच्या नवीन जादा तुकडया कायम विना अनुदान तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत अशा तुकडया देखील अनुदानास पात्र असणार नाहीत.

जादा मंजूर तुकडयानुसार सेवकसंच मान्य करुन घेणे व नवीन पदावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता घेणे याबाबत त्वरीत कार्यवाही करुन द्यावी.

शिक्षणाधिकारी [माध्य.]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

१ ... ५३/२००४ ०५
दिनांक २३/११/०४

पुणे यशवंतराव चव्हाण भवन,
जिल्हा परिषद, पुणे
[ शिक्षण माध्यमिक ] -
जा. क्र. ~~शिक्षण/माध्य/ह-३/०४-०५~~

**BOOK-POST**

दिनांक : २८-१०-२००४.

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
~~श्री. संत~~ तुकाराम विद्यालय
शिवणे
ता. मावळ. जि. पुणे.

विषय :- ~~मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित~~ माध्यमिक शाळामधून नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकडया मंजूर करणे बाबत......

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक - मा. शा. अ-१००३/[३८०/२००३]/मा. शि.-१, दिनांक १३ ऑगस्ट २००४

२] मा. शिक्षण संचालक [माध्य. व उच्च माध्यमिक ] शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १ यांचे क्रमांक अमाशा १००४/ /२००४-०५/जा. तु. मंजूरी/१५-क व दिनांक ८/९/२००४ चे पत्र

३] ~~मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे क्रमांक दिनांक चे पत्र.~~

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, सन २००१ -०२ २००२-०३ व २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण कार्यालयाकडे सादर केलेले जादा तुकडी मागणीचे प्रस्ताव व कार्यालयामार्फत करण्यात आलेली पटपडताळणी व प्रत्यक्ष कागदपत्रांची केलेली छाननी याचा विचार करुन आपल्या विद्यालयास पुढील प्रमाणे नविन तुकडया त्या समोर दर्शविलेल्या तपशीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहेत.

| अ. नं. | इयत्ता | तुकडी क्रमांक | कोणत्याही शैक्षणिक वर्षापासून | जादा/ नैसर्गिक वाढीचे | विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित |
|---|---|---|---|---|---|
| १. | इ. ८वी | २री | २००३/०४ | जादाप्रवेश | कायम विनाअनुदानित |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |

४) सदरच्या मंजूर केलेल्या तुकडयांना भविष्यात लागू होणा-या अनुदान सूत्रानुसार किंवा सदयस्थितीत लागू असलेल्या दिनांक १५ नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या वर्षी मूल्यांकनात पात्र ठरतील त्या वर्षापासून म्हणजेच पाचव्या वर्षी २० टक्के, त्यापुढील वर्षी अनुक्रमे ४० टक्के, ६० टक्के, ८० टक्के व १०० टक्के या प्रमाणात सदर तुकडया अनुदानास पात्र होतील. अनुदानास तुकडी पात्र झाली म्हणजे त्या तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही. संबंधित तुकडयांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार शासन निकषपात्र तुकडयांना अनुदान लागू करेल.

13/9/2012

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक)**
पुणे जिल्हा परिषद पुणे.

प्रति,

मुख्याध्यापक संबंधित शाळा ता.---------------------------------- जि.पुणे.

२/- सदर आदेशानुसार आपण सन २०१२-१३ ची सेवकसंच निश्चिती करुन घ्यावी.

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u>** –

१) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-०१.

२) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-०१

३) अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक पुणे-०१.

वाचा - १) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील निर्णय क्रमांक माशातु-२०१२/(९०/१२) / माशि-१ दिनांक १६ ऑगस्ट २०१२.

२) शासन निर्णय क्र.माशातु-२०१०/(४२०/१०) /माशि-१ दिनांक १४/६/२०१०.

३) मा.शिक्षण संचालक माध्य.व उच्च माध्य.शिक्षण संचालनाय पुणे यांचेकडील पत्र क्र.अमाशा/२०१२-१३/अतिरिक्त तुकडया/१५ क(०६)/ ८०८५ दिनांक २१/८/२०१२.

४) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र.शिउसं/माध्य-३/१३/२२०७५/७९/ अतिरिक्त तुकडया/पुवि/१२ दिनांक ५/९/२०१२.

५) आपलेकडील सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ चे पटपडताळणी अहवाल तसेच सदर वर्षाचे अतिरिक्त तुकडी मागणी प्रस्ताव.

६) कार्यालयीन मान्य टिपणी दिनांक १०/०९/२०१२.

---

**पुणे जिल्हा परिषद पुणे.**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**माध्यमिक शिक्षण विभाग**
**जा.क्र.जिप/माध्य/अतितु/शिबीर/१२**
**पुणे दिनांक १२/०९/२०१२.**

## विना अनुदान तुकडी मंजुरी आदेश –

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित / विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंतच्या वर्गांना नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकडयांना **सन २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर** मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर यादीनुसार आपल्या शाळेस खालील अटीस अधीन राहुन शहरी व ग्रामीण विभागातील शाळांतील **अतिरिक्त तुकडयांस शैक्षणीक वर्ष २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.**

| अ.नं | शाळेचे नाव | इयत्तानिहाय तुकडयांची संख्या | | | | | | एकूण तुकडया |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी | |
| | | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | |
| १ | संत तुकाराम माध्यमिक विदयालय शिवणे ता.मावळ | ------- | ------- | ------- | ------- | १ | ------- | १ |
| | | ------- | ------- | ------- | ------- | २ री | ------- | |

१) इ.५ वी ते ८ वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकडया सुरु करताना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

२) इ.९ वी व १० वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकडया सुरु करताना शाळेमध्ये माध्यमिक शाळा संहिता कलम ८.३ (एक) नुसार भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३) प्रत्यक्षात निकषानुसार आवश्यक विदयार्थी पटसंख्या कमी आढळल्यास सदरचे तुकडी मंजूरीचे आदेश आपोआप रद्द होतील.

P.T.O.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.. शिक्षण माध्यमिक.
शिक्षण/माध्य/ह-४/प्रथम मान्यता/९५
पुणे, दि. २३/१०/९५.

प्रति,

**BOOK-POST**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
श्री संत तुकाराम विद्यालय, शिवणे.
ता. मावळ, जि. पुणे

शिवणे
SHIVANE B.O.
23.10.75
PUNE

विषय :- इ. १०वी वर्गास प्रथम मान्यता.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कडील पत्र क्र. माध्य ३/प्र.मा./तुवि/९५. दि. ५/१०/९५.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेव्दारा संचालित मराठी/ ~~इंग्रजी~~ माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १०वी च्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन ग्रंथांची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर उपलब्ध करावे.
६] पुरेसा ... प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] शैक्षणिक, कार्यानुभव व क्रीडा साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
८] शैक्षणिक साहित्याचा अध्यापनार्थ वापर असावा.
९] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.
१०] वाढीव फीचे दर मा. शि. संचालक, म.रा. पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
११] माध्यमिक शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.
१२] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
१३] शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी खाते उघडावीत.
१४] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करुन घेण्यात यावी.
१५] अभ्यासेतर कार्यक्रम, विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.

[signature]
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता

[signature]
मुख्याध्यापक
श्री संत तुकाराम विद्यालय
मु. पो. शिवणे, ता. मावळ, जि. पुणे